# १. विद्याशाखेचा परिचय

वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा हा मुक्त विद्यापीठाचा एक महत्त्वाचा भाग आहे. विद्यापीठाच्या स्थापनेपासून ही विद्याशाखा कार्यरत आहे. सन १९९१ पासून भारताने मुक्त धोरणाचा स्वीकार केल्यानंतर देशात तसेच आंतरराष्ट्रीय क्षेत्रात प्रचंड घडामोडी झाल्या. माहिती, तंत्रज्ञान आणि संगणक युगात पारंपरिक व्यापार पद्धतीला फाटा देऊन इंटरनेट, ई–कॉमर्स अशा संज्ञा रूढ झाल्या. त्यानुसार शिक्षणपद्धतीच्या तंत्रज्ञानातही बदल करावा लागला. व्हर्च्युअल शिक्षणपद्धती, सीडीच्या माध्यमातून विविध विषयांची माहिती करून देणे, इंटरनेटवरून आवश्यक ते संदर्भ विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे, उपग्रहाद्वारे शिक्षण तसेच अद्ययावत तंत्रज्ञानाने युक्त अशा माहितीचे स्रोत विद्यार्थ्यांना प्राप्त करून देणे अशांसारख्या सोई विद्यार्थ्यांना उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनाच्या क्षमतेत निश्चितच वाढ झाल्याचे दिसून येते आणि हे कार्य वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेने यशस्वीपणे पार पाडले आहे.

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत तीन पदव्युत्तर शिक्षणक्रम, पाच पदवी शिक्षणक्रम आणि चार पदविका शिक्षणक्रम चालविले जातात. या शिक्षणक्रमात एम. बी. ए., एम. कॉम, बी. कॉम., बीसीएम, सहकार व्यवस्थापन पदविका, इत्यादी शिक्षणक्रमांचा समावेश आहे. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

## उद्दिष्टे

(१) व्यापार–उद्योग, व्यवस्थापनशास्त्र, सहकार, इत्यादी क्षेत्रांतील व्यवहारज्ञान प्राप्त करून बहुश्रुतता वाढविणे.

(२) कार्यालये, संस्था, कंपन्या ह्यांच्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देणे.

(३) सातत्याने होणाऱ्या सुधारणा/बदल यांसाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविणे.

(४) विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकास गुण वृद्धिंगत करणे.

(५) संशोधन कार्यातून वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र प्रगल्भ करणे.

(६) प्रसिद्धीच्या माध्यमातून विविध शिक्षणक्रम सर्वदूर पसरविणे.

(७) व्यवस्थापक होऊ पाहणाऱ्यांना ज्ञानार्जनाच्या संधी उपलब्ध करून देणे.

(८) समृद्ध जीवन जगण्यासाठी ज्ञानात्मक आधार देणे.

(९) सहकार क्षेत्रासाठी आवश्यक मनुष्यबळ तयार करणे.

# २. बी.कॉम. (सहकार व्यवस्थापन) पदवी (G40) शिक्षणक्रमाविषयी

## २.१ शिक्षणक्रमाची संरचना

बी.कॉम. (सहकार व्यवस्थापन) पदवी परीक्षेचा शिक्षणक्रम एकूण १०८ श्रेयांकांचा आहे. हा शिक्षणक्रम प्रत्येकी १०० गुणांच्या १८ अभ्यासक्रमांमध्ये विभागण्यात आला आहे. दरवर्षी ६ अभ्यासक्रम याप्रमाणे ३ वर्षांत एकूण १८ अभ्यासक्रम अभ्यासावयाचे आहेत. पदवी शिक्षणक्रमातील अभ्यासक्रमांची मांडणी पुढील तीन गटांत करण्यात आली आहे.

| वर्ष | अभ्यासक्रम | श्रेयांक |
|---|---|---|
| प्रथम | अधिष्ठान/सक्तीचे | ३६ |
| द्वितीय | ऐच्छिक/सक्तीचे | ३६ |
| तृतीय | वैकल्पिक/विशेषीकरण | ३६ |
| | एकूण | १०८ |

### प्रथम वर्ष (सर्व अभ्यासक्रम सक्तीचे)

| क्र. | अभ्यासक्रम | एकूण संपर्कसत्रे | गुण |
|---|---|---|---|
| (१) | (ECO 201) व्यावसायिक अर्थशास्त्र | ०९ | १०० |
| (२) | (HEN 101) हिंदी व इंग्रजी भाषांचा अधिष्ठान अभ्यासक्रम | ०९ | १०० |
| (३) | (MGM 218) सहकार : तत्त्वे आणि कार्यपद्धती | ०९ | १०० |
| (४) | (MGM 219) सहकारी व्यवस्थापन व प्रशासन | ०९ | १०० |
| (५) | (MGM 220) सहकारी कायदा व इतर कायदे | ०९ | १०० |
| (६) | (MGM 221) सहकारी जमाखर्च, बँकिंग व लेखापरीक्षण | १२ | १०० |
| | एकूण | ५७ | ६०० |

**टीप : हिंदीसाठी ४ व इंग्रजीसाठी ५ संपर्कसत्रे आहेत.**

### द्वितीय वर्ष

| क्र. | अभ्यासक्रम | गुण |
|---|---|---|
| (१) | (COM 221) परिव्यय अंकेक्षण आणि कर आकारणी | १०० |
| (२) | (COM 211) कार्यालयीन व्यवस्थापन | १०० |
| (३) | (COM 220) भारतीय आर्थिक पर्यावरण | १०० |
| (४) | (COM 106) वाणिज्यशास्त्र | १०० |
| (५) | (MGM 225) व्यवसाय संज्ञापन | १०० |
| (६) | (MGM 240) सहकारी कृषिव्यवसाय | १०० |
| (७) | (EVS 201) पर्यावरण अभ्यास | –– |
| | एकूण | ६०० |



g5bb

### तृतीय वर्ष

| क्र. | अभ्यासक्रम | गुण |
|---|---|---|
| (१) | (COM 222) मानव संसाधन व्यवस्थापन | १०० |
| (२) | (MGM 230) सहकारी दुग्ध व्यवसाय | १०० |
| (३) | (MGM 308/309) विपणन व्यवस्थापन | १०० |
| (४) | (MGM 231) सहकारी बँकिंग | १०० |
| (५) | (MGM 235) शिखर सहकारी संस्था | १०० |
| (६) | (MGM 222) स्थिती-अभ्यास/प्रकल्प अहवाल | १०० |
| | एकूण | ६०० |
| | **प्रथम + द्वितीय + तृतीय वर्ष एकूण गुण** | **१८००** |

**टीप :**

पदवी द्वितीय व तृतीय वर्षाच्या गुणांवर दिली जाईल. मात्र त्यासाठी प्रथम वर्ष उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

## अभ्यासक्रम

## (१) प्रथम वर्ष अभ्यासक्रम

### (ECO 201) व्यावसायिक अर्थशास्त्र

**पुस्तक १ : व्यवसाय संस्था व मागणीचे विश्लेषण**

**भाग १**

घटक १ (अ) : काही मूलभूत संकल्पना : संयंत्र, व्यवसाय संस्था व उद्योग

(आ) : व्यवसाय संस्थेची उद्दिष्टे

(इ) : व्यवसाय संस्थेच्या निर्णय प्रक्रियेवर प्रभाव पाडणारे घटक

घटक २ (अ) : व्यवसाय संस्थेचे आकारमान : मापन व निर्धारण

(आ) : लघुउद्योग : स्वरूप, महत्त्व आणि समस्या

**भाग २**

घटक १ (अ) : मागणी : संकल्पना आणि स्वरूप

(आ) : मागणीतील बदल आणि मागणी सिद्धान्त

घटक २ : मागणीची लवचीकता

घटक ३ : भविष्यकालीन मागणीचे पूर्वानुमान

### (HEN 101) हिंदी व इंग्रजी भाषांचा अधिष्ठान अभ्यासक्रम

पुस्तक १ : हिंदी भाषा का परिचय और उसकी संरचना

२ : हिंदी भाषा का परिचय और उसकी संरचना : कार्यपुस्तिका

३ : Foundation Course in English

४ : Foundation Course in English : Work Book

### (MGM 218) सहकार : तत्त्वे आणि कार्यपद्धती

पुस्तक १ : सहकार : इतिहास व तत्त्वे

२ : सहकारी अर्थव्यवस्था व कार्यपद्धती

३ : सहकारी कृषी पतपुरवठा, प्रक्रिया व पणन

४ : कृषिपूरक उद्योग आणि नागरी सहकारी संस्था

### (MGM 219) सहकारी व्यवस्थापन व प्रशासन

पुस्तक १ : व्यवस्थापन तत्त्वे व कार्य

२ : सहकारी व्यवस्थापन

३ : सहकारी प्रशासन : भाग-१

४ : सहकारी प्रशासन : भाग-२

### (MGM 220) सहकारी कायदा व इतर कायदे

पुस्तक १ : महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम १९६० व नियम १९६१ भाग-१

२ : महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम १९६० व नियम १९६१ भाग-२

३ : महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम १९६० व नियम १९६१ भाग-३

४ : सहकारी संस्थांच्या संबंधित अन्य कायदे

### (MGM 221) सहकारी जमाखर्च, बँकिंग व लेखापरीक्षण

पुस्तक १ : सहकारी संस्थांतील हिशेबाची अन्य पुस्तके: भाग-१

२ : सहकारी संस्थांतील हिशेबाची अन्य पुस्तके: भाग-२

३ : सहकारी बँकिंग

४ : सहकारी लेखापरीक्षण

## (२) द्वितीय वर्ष अभ्यासक्रम

### (COM 221) परिव्यय अंकेक्षण आणि कर आकारणी

पुस्तक २ : परिव्यय लेखांकन परिचय, वित्तीय व परिव्यय लेखांकनातील फरक/भेद, परिव्यय एकक आणि परिव्यय केंद्र, परिव्यय घटक आणि परिव्यय पत्र

३ : **आयकर**
उत्पन्न कर कायदा १९६२, व्याप्ती व उद्दिष्टे, व्याख्या, उत्पन्न, व्यक्ती, शेती उत्पन्न, सूट उत्पन्न, भांडवली व महसुली प्राप्ती आणि खर्चाच्या संकल्पना

### (COM 211) कार्यालयीन व्यवस्थापन

पुस्तक १ : कार्यालय : रचना व कार्यपद्धती

२ : कार्यालय संघटना व कर्मचारी व्यवस्थापन

३ : दप्तर व्यवस्थापन व जनसंपर्क

### (COM 220) भारतीय आर्थिक पर्यावरण

पुस्तक १. आर्थिक पर्यावरण

घटक १ : प्रास्ताविक-संकल्पना, घटक, पर्यावरणावर परिणाम करणारे घटक, पर्यावरणाचे प्रकार, पर्यावरणाचे व्यवस्थापन, पर्यावरण-मानव व विकास.

घटक २ : आर्थिक पर्यावरणाचे महत्त्व, भारतीय नियोजनाचे पाच दशकांतील बदलते आर्थिक चित्र

घटक ३ : वने, पाणी व ऊर्जा यांच्या विशेष संदर्भात भारतातील नैसर्गिक स्त्रोत (साधनसामग्री)

पुस्तक २. कृषी उद्योग व सेवा क्षेत्र

घटक ४ : शेती–धारणा आकार, जमिनाचा वापर, पीक पद्धती, उत्पादकता, कृषी उत्पादन

घटक ५ : कारखाने–स्वातंत्र्योत्तर काळातील लघू, मध्यम आणि मोठ्या प्रमाणावरील उद्योगांचा औद्योगिक विकास, लघू व मध्यम उद्योगधंदे आणि त्यांच्या समस्यांबाबतीत शासनाचे धोरण

घटक ६ : पायाभूत सुविधांचा विकास

पुस्तक ३. आर्थिक धोरण व नियोजन

घटक ७ : भारतातील आर्थिक धोरणे– नाणेविषयक, वित्तीय आणि परदेशी व्यापार, परदेश सहयोग व बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका

घटक ८ : औद्योगिक कामगारासंबंधी शासकीय धोरण, मालकी व व्यवस्थापनातील सहभाग, सार्वजनिक खर्च व सार्वजनिक कर्ज

घटक ९ : भारतीय नियोजन– वैशिष्ट्ये, पंचवार्षिक नियोजनाचे यश व अपयश– मानव संसाधन विकसन धोरणे व कृती, राष्ट्रीय लोकसंख्या धोरण

### (COM 106) वाणिज्यशास्त्र

पुस्तक १ : अर्थशास्त्र परिचय व वाणिज्याची उत्क्रांती

२ : वाणिज्य व्यवहार पद्धती

३ : लेखापालन

### (MGM 225) व्यवसाय संज्ञापन

पुस्तक १ : संज्ञापनाची मूलतत्त्वे व माध्यमे

घटक १ : संदेश प्रक्रिया

घटक २ : संज्ञापनाची नावे

घटक ३ : संज्ञापनाची विभिन्न माध्यमे

घटक ४ : संज्ञापनाच्या आधुनिक पद्धती व साधने

पुस्तक २ : लेखी व तोंडी संज्ञापन

घटक ५ (अ) : लेखी संज्ञापनाचे महत्त्व व प्रकार

(आ) : पत्रलेखनाचे प्रकार

(इ) : अहवाल

घटक ६ : तोंडी संज्ञापन

पुस्तक ३ : प्रभावी संज्ञापन व मानवी संबंध

घटक ७ : संज्ञापनातील अडथळे

घटक ८ : प्रभावी संज्ञापन

घटक ९ : संज्ञापन आणि मानवी संबंध

घटक १० : व्यवस्थापकीय कार्यक्षमतेत संज्ञापनाचे महत्त्व

### (MGM 240) सहकारी कृषिव्यवसाय

पुस्तक १. कृषी पतपुरवठा

२. पणन व प्रक्रिया सहकारी संस्था

३. कृषिव्यवसाय संज्ञापन

४. बाजारपेठ/विक्री व्यवस्थापन

### ऑडिट कोर्स – पर्यावरण विकास

हा अभ्यासक्रम ४ श्रेयांकाचा असून द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना ऑडिट कोर्स म्हणून घेणे अनिवार्य आहे. सदर अभ्यासक्रमाचे स्वतंत्र पुस्तक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर सॉफ्ट कॉपी स्वरूपात उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी त्याचा वापर करावा. छापील स्वरूपात सदर पुस्तक उपलब्ध होणार नाही. या विषयात विद्यार्थ्यांस किमान 'सी' श्रेणी मिळविणे गरजेचे असेल.

## (३) तृतीय वर्ष अभ्यासक्रम

### (COM 222) मानवी संसाधन व्यवस्थापन

**पुस्तक १ : मानव संसाधन**

मानव संसाधन व्यवस्थापनाचे स्वरूप आणि व्याप्ती, मानव संसाधन विकसन आणि संघटन, कार्यविश्लेषण

**पुस्तक २ : मानव संसाधन नियोजन**

मानव संसाधन नियोजन, भरती, निवड, परिचय सत्र आणि कार्यनिर्धारण

**पुस्तक ३ : मानव संसाधन विकास**

प्रशिक्षण व विकसन, कार्यसिद्धी मूल्यमापन आणि कार्य मूल्यमापन

### (MGM 230) सहकारी दुग्धव्यवसाय

पुस्तक १ : सहकारी दुग्धव्यवसायाची ओळख व कार्यपद्धती

२ : सहकारी दुग्धव्यवसाय व त्याचे तंत्र

३ : दुग्धव्यवसायाचे व्यवस्थापन व अर्थशास्त्र

४ : दूध व दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती व विपणन

### (MGM 308) विपणन व्यवस्थापन–१

पुस्तक १ : विपणन

बाजारपेठ आणि विपणन, विपणन पर्यावरण, विपणन व्यवस्थापन आणि नियोजन, बाजारपेठ खंडीकरण आणि लक्ष्य

पुस्तक २ : विपणन मिश्र

विपणन मिश्र, सेवांचे विपणन

पुस्तक ३ : विपणन माहिती

विपणन माहिती व्यवस्था, विपणन संशोधन, विपणन नियंत्रण

### (MGM 309) विपणन व्यवस्थापन–२

पुस्तक १ : जाहिरात

जाहिरात, जाहिरात मोहीम, जाहिरातीचे संघटन

पुस्तक २ : विक्रय कला

विक्रय अनुमान, विक्रय कला आणि विक्रीवृद्धी, विक्रेता संच व्यवस्थापन

पुस्तक ३ : ग्राहक समाधान

ग्राहक वर्तन, ग्राहक समाधान व्यवस्थापन, विपणन, अंकेक्षण

### (MGM 231) सहकारी बँकिंग

पुस्तक १ : बँकिंग कायदे

२ : बँकिंग व्यवहार

३ : लेखापरीक्षण व तपासणी

४ : मानवी संसाधन व तंत्रज्ञान व्यवस्थापन

### (MGM 235 ) शिखर सहकारी संस्था

पुस्तक १. भाग–१: राज्यातील शिखर सहकारी संस्था

भाग–२: देशातील शिखर सहकारी संस्था

### (MGM 222) स्थिती–अभ्यास/प्रकल्प अहवाल

पुस्तक १ : सहकारी संस्था : निवडक स्थिती–अभ्यास

## २.४ शिक्षणक्रम शुल्क

| | |
|---|---|
| विद्यापीठ शुल्क (ऑनलाईन) | रु. १६००=०० |
| अभ्यासकेंद्र शुल्क (अभ्यासकेंद्रावर भरावे) | रु. ८००=०० |
| **एकूण शिक्षणक्रम शुल्क** | **रु.** २४००=०० |

## विद्यापीठ शुल्काचा तपशील

| अ.क्र. | शुल्काचे शीर्षक | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष |
|---|---|---|---|---|
| ०१. | प्रवेश व नोंदणी शुल्क | १०० | १०० | १०० |
| ०२. | शैक्षणिक शुल्क | ४०० | ४०० | ४०० |
| ०३. | परीक्षा (अंतर्गत/अंतिम) शुल्क | ४५० | ४५० | ७५० |
| ०४. | संकीर्ण खर्च | २०० | २०० | २०० |
| ०५. | विकासनिधी | ४५० | ४५० | १५० |
| ०६. | अभ्यासकेंद्र शुल्क | ८०० | ८०० | ८०० |
| **एकूण शिक्षणक्रम शुल्क (रु.)** | | **२४००** | **२४००** | **२४००** |

### शुल्क भरण्यासंबंधी सूचना

(१) विद्यापीठ शिक्षणक्रम शुल्क रु. १,६००/– विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या पद्धतीनेच (ऑनलाईन) भरावे.

(२) अभ्यासकेंद्र शुल्क अभ्यासकेंद्रावर भरून त्याची पावती घ्यावी.

### अनुत्तीर्ण विद्यार्थी

विद्यार्थी ज्या विषयात अनुत्तीर्ण झाले असतील, अशा प्रत्येक अनुत्तीर्ण विषयासाठी रु. १००/– परीक्षा शुल्क व रु. ५०/– गुणपत्रक व टपालखर्चासाठी भरणे आवश्यक राहील.

## २.५ कालावधी

शिक्षणक्रमाचा एकूण कालावधी आठ वर्षांचा असेल. या कालावधीतच सहकार व्यवस्थापन पदवी संपादन करावी लागेल. अन्यथा शिक्षणक्रमासाठी पुन्हा प्रवेश घ्यावा लागेल.

## २.६ माध्यम

इंग्रजीच्या अभ्यासक्रमाखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांसाठी मराठी माध्यम राहील. इंग्रजीखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांची पाठ्यपुस्तके, श्रवणफिती, चित्रफिती, अभ्यासक्रमांचे मार्गदर्शन, गृहपाठ, वर्गाचाचणी व अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका मराठी व इंग्रजी भाषेतून राहतील. मात्र प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी **मराठी** किंवा **इंग्रजी** भाषेचा वापर करण्याचे स्वातंत्र्य राहील.

## २.७ मूल्यमापन प्रक्रिया

विद्यार्थ्यांचे मूल्यमापन दोन प्रकारे केले जाते.

### अंतर्गत मूल्यमापन

प्रत्येक अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी ४ गृहपाठ करणे आवश्यक राहील. प्रत्येक गृहपाठास २० गुण असतील. सदरचे गृहपाठ त्या त्या वर्षीच करणे बंधनकारक राहील.

### अंतिम मूल्यमापन

अंतिम परीक्षा ही १०० गुणांची असेल. एकत्रित गुण खालील–प्रमाणे राहील.

| अ. क्र. | तपशील | गुण |
|---|---|---|
| १. | गृहपाठ (प्रत्येकी ४ गृहपाठ २० गुणांचे) | ८० : २० |
| २. | अंतिम परीक्षा | १०० : ८० |

प्रत्येक अभ्यासक्रमाची १०० गुणांची ३ तास वेळ असणारी अंतिम परीक्षा घेण्यात येईल. साधारणतः अंतिम परीक्षा मे महिन्यात असेल. अंतिम परीक्षेचे स्वरूप पुढीलप्रमाणे :

(१) **वस्तुनिष्ठ प्रश्न –** २० प्रश्न (एकूण २५ पैकी) सोडविणे. प्रत्येक प्रश्न १ गुण – एकूण २० गुण. यात गाळलेल्या जागा भरा, जोड्या लावा, इत्यादी प्रश्न असतील.

(२) **अतिलघूत्तरी प्रश्न–**१० प्रश्न (एकूण १५ पैकी) सोडविणे. प्रत्येक प्रश्न २ गुणांचा – एकूण गुण २०. यात व्याख्या द्या, कारणे द्या, एका वाक्यात उत्तरे द्या, संकल्पना स्पष्ट करा, असे प्रश्न असतील.

(३) **लघूत्तरी प्रश्न –** ६ प्रश्न (एकूण ९ पैकी) सोडविणे. प्रत्येक प्रश्न ६ गुणांचा असे ३६ गुणांचे प्रश्न असतील. यात मुद्देसूद व संक्षिप्त स्वरूपात उत्तरे लिहिता येतील असे प्रश्न असतील.

(४) **दीर्घोत्तरी प्रश्न –** २ प्रश्न (एकूण ४ पैकी) सोडविणे. प्रत्येक प्रश्नास १२ गुण याप्रमाणे २४ गुणांचे प्रश्न असतील. हे निबंधात्मक स्वरूपाचे प्रश्न असतील.

## स्थिती–अभ्यास/प्रकल्प अहवाल (MGM 222)

निवडलेल्या सहकारी संस्थेचा स्थिती–अभ्यास (Case Study)/ प्रकल्प अहवाल (Project Report) विद्यार्थ्यांना स्वतः करावा लागेल. त्यासाठी संबंधित संस्थेला प्रत्यक्ष भेट देणे, त्यांच्याकडून माहिती मिळवून संस्थेच्या वार्षिक अहवालाचे मूल्यमापन करणे, इत्यादी बाबतींत अभ्यास करून तो केंद्रसंयोजकाकडे विहित मुदतीत सादर करावा लागेल. तिसऱ्या वर्षी स्थिती–अभ्यास सादर करावयाचा आहे.

ज्या संस्थेचा स्थिती–अभ्यास केला असेल त्या संस्थेच्या सक्षम अधिकाऱ्याकडून उपस्थितीबाबतचा दाखला स्थिती–अभ्यासासोबत जोडणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी केंद्रसंयोजकांकडे स्थिती–अभ्यासाचा अहवाल मुदतीत सादर केल्यानंतर केंद्रसंयोजक सर्व स्थिती–अभ्यास विद्यापीठाकडे ठरवून दिलेल्या मुदतीत सादर करतील. स्थिती–अभ्यासाचे मूल्यमापन विद्यापीठाकडून करण्यात येईल. यासाठी १०० गुण ठेवण्यात आले आहेत.

# ४. अभ्यासकेंद्रे

**शिक्षणक्रम : बी.कॉम. (सहकार व्यवस्थापन) पदवी (G40)**

| क्र. | अभ्यासकेंद्र संकेतांक | अभ्यासकेंद्र | पत्ता | दूरध्वनी |
|---|---|---|---|---|
| १. | १२८६अ | राष्ट्रीय सहकारिता विकास तथा ग्रामीण प्रबंधन संस्था | बालाजी प्लॉट, गोपालप्रभा मंगलकार्यालयासमोर अमरावती – ४४४ ६०१ | (०७२१) २५७८५६३ |
| २. | ११५३अ | नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पिपल्स एज्युकेशन अँड ट्रेनिंग फॉर सोसायटीज अँड वर्कस् | द्वारा : श्री. बी. जे. काळे, कृष्णाऊ कीर्तीनगर, गोरक्षण रोड अकोला – ४४४ ००४ | (०७२४) २४५९३९६ |
| ३. | २२५३अ | वसंतराव काळे पत्रकारिता व जनसंवाद महाविद्यालय | डॉ. गव्हाणे बिल्डिंग, के. एस. के. कॉलेज रोड, शिवाजीनगर बीड – ४३१ १२२ | (०२४४२) २२०६२१ |
| ४. | ६४५९अ | किसनविर महाविद्यालय | मु. पो. वाई, जि. सातारा | (०२१६७) २२०८४८ |
| ५. | ७३७१अ | कोकण ॲग्रीकल्चर एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट | निवळी, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी | (०२३५५) २३३११६ फॅक्स – २३३११७ |
| ६. | ७३०२अ | वराडकर आर्टस् अँड बेलोसे कॉमर्स कॉलेज | मु. पो. दापोली, जि. रत्नागिरी | (०२३३८) २७११०४ |
| ७. | ७११२१ | महावीर महाविद्यालय, कोल्हापूर | कोल्हापूर – ४१६ ००३ | (०२३१) २६५१८३० |
| ८. | ४६१२अ | दगडूजी देशमुख संशोधन व प्रशिक्षण केंद्र | एम.एस.इ.बी. कार्यालय, ३ रा मजला डॉ. आंबेडकर चौक, आमगाव जि. गोंदिया – ४१० ९०२ | ९७६४०७९२६५ |

## परिशिष्ट १० : आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा आदेश

आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

क्र. एडीएम/२-ए/सेक्शन – ७४ (१) १९९६
दि. ६ ऑगस्ट १९९६

### आदेश

ज्याअर्थी, महाराष्ट्रात सुरू असलेल्या दशकात सहकारी संस्थांच्या संख्येत व त्यांच्या व्यवहारात लक्षणीय वाढ झालेली आहे. त्यामुळे सहकारी संस्थांचे व्यवस्थापन हे गुंतागुंतीचे व आव्हानात्मक झालेले आहे आणि ज्याअर्थी, यापुढे सहकारी संस्थांना मुक्त आर्थिक व्यवस्थेत बाजारपेठीय स्पर्धेला सामोरे जावे लागणार आहे, त्यामुळे सहकारी संस्था अधिनियम या व्यावसायिक व्यवस्थापनाच्या तत्त्वानुसार चालविणे अपरिहार्य झाले आहे. तसेच सहकारी संस्थांचे व्यवस्थापन कार्यक्षम व प्रगतीपथावर चालविण्यासाठी सहकारी संस्थांमध्ये काम करणारे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर अधिकारी व्यावसायिकदृष्ट्या आणि उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त करणारे असणे आवश्यक आहे, आणि

ज्याअर्थी, या कार्यालयाने दिनांक २९-२-१९८८ व ६-९-१९८८ च्या आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० चे कलम ७४(१) अन्वये सहकारी संस्थांच्या अधिकाऱ्यांनी धारण करावयाची शैक्षणिक अर्हता विहित केली होती. या संदर्भात महाराष्ट्र प्रदेश सहकारी बँक कर्मचारी महासंघ, नागपूर, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई आणि महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि व ग्रामीण विकास बँक, मुंबई यांनी व त्यांच्या काही अधिकाऱ्यांनी वेळोवेळी शासनाकडे या कार्यालयाकडे निवेदने दाखल केलेली आहेत. या सर्व निवेदनांमध्ये या कार्यालयाने दिनांक २९-२-१९८८ व ६-९-१९८८ अन्वये विहित केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा पुनर्विचार करण्याची मागणी केलेली आहे, आणि

ज्याअर्थी, कार्यालयाने दिनांक २९-२-१९८८ व ६-९-१९८८ रोजी जारी केलेल्या आदेशासंबंधी संबंधितांशी सविस्तर चर्चा होऊन सदर आदेशाच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणींचा आढावा घेण्यात आला. त्यानुसार सदर आदेशांमध्ये फेरबदल करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, कार्यालयाने दिनांक २९-२-१९८८ व ६-९-१९८८ अन्वये जारी केलेल्या आदेशातील अटी व शर्तीमध्ये तसेच सहकारी संस्थांच्या अधिकाऱ्यांना आवश्यक असणाऱ्या अर्हता संबंधी फेरबदल करण्यात येत आहेत आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७४(१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, सहकारी संस्थांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, वित्त अधिकारी, व्यवस्थापक, सचिव, लेखापाल यांच्या नेमणुकीसाठी शैक्षणिक अर्हता खाली नमूद केलेल्या शर्ती व अटीस अधीन राहून सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ' मध्ये नमूद केल्याप्रमाणे विहित करीत आहे.

(१) तांत्रिक पदांसाठी व परसेवेतील पदांसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता लागू राहणार नाही. तांत्रिक पदांसाठी संबंधित संस्था त्यांच्या सेवा नियमांमध्ये पात्रतेसंबंधी ज्या तरतूदी असतील त्याप्रमाणे अधिकाऱ्यांच्या नेमणूका व पदोन्नती करू शकतील.

(२) सहकारी संस्थेच्या अधिकाऱ्यांना तत्त्वांचे व कायद्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यामुळे सहकारी क्षेत्रातील अधिकाऱ्यांची मूळ शैक्षणिक पात्रता वेगवेगळी असली तरी, त्यांनी (एच.डी.सी.एम., डी.सी.बी., जी.डी.सी. अँड ए. आणि डी.सी.एम.) यापैकी कोणतीही एक पदविका धारण करणे आवश्यक आहे. मात्र सहकारातील पदविकेची आवश्यकता प्रथम नेमणुकीच्या वेळी लागू राहणार नाही. कारण या पदविका सहकारी संस्थांच्या सेवेत नेमणूक झाल्यानंतरच मिळविता येतात. सरळ भरतीने नेमण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेली सहकारातील पदविका सोडून इतर पात्रता किमान अर्हता म्हणून लागू राहतील. मात्र असे अधिकारी संस्थेच्या सेवेत रूजू झाल्यानंतर त्यांनी ५ वर्षात सहकारातील पदविकेसंबंधी पात्रता धारण करणे बंधनकारक राहील.

(३) सेवा ज्येष्ठतेप्रमाणे पदांकरिता आवश्यक असलेली किमान पात्रता अधिकारी धारण करीत असल्यास पदोन्नती देताना त्यांनी पाच वर्षात सहकाराची पदविका संपादन करणे आवश्यक आहे. जर या मुदतीत संबंधिताने सहकारी पदविका संपादन केली नाही, तर अशा अधिकाऱ्यांना पुढील पदोन्नतीसाठी अपात्र ठरवणेत यावे. सदर अट संबंधित अधिकारी ४५ वर्षे वयाचे झाले तरी शिथिल करण्यात येऊ नये.

(४) इतर प्रकरणात कर्मचारी ४५ वर्षे वयाचे असल्यास या आदेशात विहित केलेल्या शैक्षणिक अर्हतेची अट लागू राहणार नाही.

(५) या कार्यालयाने जारी केलेल्या दिनांक २९-२-१९८८ च्या आदेशाप्रमाणे अर्हता नसणाऱ्या अधिकाऱ्यांनी सदरची अर्हता मिळविण्यासाठी पदोन्नती नंतर ३ वर्षे सवलत या कार्यालयाच्या आदेश दिनांक ६-९-१९८८ अन्वये दिलेली आहे. या संदर्भात निर्माण झालेल्या समस्या विचारात घेऊन या आदेशाच्या तारखेपासून पुढील ५ वर्षात विहित केलेली सहकारातील शैक्षणिक अर्हता संबंधितांनी प्राप्त करण्याची सवलत देण्यात येत आहे.

(६) सहकारी संस्थांनी त्यांच्या अधिकाऱ्यांच्या एच.डी.सी.एम., डी.सी.बी.एम. व डी.सी.बी. या पदविकेच्या प्रशिक्षणासाठी सेवाजेष्ठतेप्रमाणे पाठवावे.

(७) सेवा नियमासंबंधी मूळ करारात बदल होत असल्यामुळे मुंबई औद्योगिक संबंध कायद्यातील तरतूदीप्रमाणे अशा बदलाची नोटीस देण्याची संबंधीत संस्थेने कार्यवाही करावी.

सही
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे – ४११ ००१

## प्रपत्र – अ

### (या कार्यालयाचे आदेश क्र. ए.डी.एम./२-/सेक्शन७४(१) दिनांक ६-८-१९९६)

## सहकारी संस्था आणि त्यातील पदे

| संस्थेचा प्रकार व अधिकाऱ्याचे नाव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|
| **(०१) शिखर सहकारी संस्था आणि विभागीय शिखर संस्था** | |
| (अ) मुख्य कार्यकारी अधिकारी | विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी किंवा एम.बी.ए./कॉस्ट अकोटंट/चार्टर्ड अकोटंट आणि एच.डी.सी.एम./ डी.सी.बी.एम./ डी.सी.बी./ डी.सी.एम./जी.डी.सी. अँड ए. |
| (ब) वित्त अधिकारी/व्यवस्थापक/सचिव | मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदाशी संबंधित विषयातील पदवी किंवा एम.बी.ए./ कॉस्ट अकौंटंट/ चार्टर्ड अकौंटंट आणि एच.डी.सी.एम./ डी.सी.बी.एम. / डी.सी.बी./ डी.सी.एम./ जी.डी.सी. अँड ए. |
| **(०२) राज्य सहकारी बँक** | |
| (अ) कार्यकारी संचालक | विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी किंवा एम.बी.ए. /कॉस्ट अकौंटंट/चार्टर्ड अकौंटंट आणि एच.डी.सी.एम. / डी.सी.बी.एम./ डी.सी.बी./ डी.सी.एम. / जी.डी.सी.अँड ए. |
| (ब) सरव्यवस्थापक/ उप सरव्यवस्थापक/ अधिकारी श्रेणी – १ व्यवस्थापक / मुख्य अधिकारी/कनिष्ठ श्रेणी अधिकारी | विद्यापीठाची पदाशी संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी किंवा एम.बी.ए./कॉस्ट अकौंटंट/ चार्टर्ड अकौंटंट आणि एच.डी.सी.एम./ डी.सी.बी./ डी.सी.एम/जी.डी.सी. अँड ए. |
| (क) इतर अधिकारी / द्वितीय श्रेणी अधिकारी / कनिष्ठ श्रेणी अधिकारी | विद्यापीठाची पदाशी संबंधित विषयातील पदवी आणि एच.डी.सी.एम./डी.सी.बी./ डी.सी.बी.एम./डी.सी.एम./जी.डी.सी. अँड ए. |
| **(०३) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक** | |
| (अ) व्यवस्थापकीय संचालक / मुख्य कार्यकारी अधिकारी / सरव्यवस्थापक / उपसरव्यवस्थापक/ व्यवस्थापक / उपव्यवस्थापक | विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी किंवा एम.बी.ए./कॉस्ट अकौंटंट/ चार्टर्ड अकौंटंट आणि एच.डी.सी.एम./ डी.सी.बी.एम./डी.सी.बी./डी.सी.एम./जी.डी.सी.अँड ए. |
| (ब) वित्त अधिकारी / सचिव / लेखाधिकारी / अधिकारी श्रेणी – १ | विद्यापीठाची पदाशी संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी किंवा एम.बी.ए. / कॉस्ट अकौंटंट/ चार्टर्ड अकौंटंट आणि एच.डी.सी.एम./डी.सी.बी.एम./डी.सी.बी./ डी.सी.एम./ जी.डी.सी.अँड ए. |
| (क) इतर अधिकारी | विद्यापीठाची पदाशी संबंधित विषयातील पदवी आणि एच.डी.सी.एम./डी.सी.बी./ डी.सी.बी.एम./डी.सी.एम./जी.डी.सी. अँड ए. |
| **(०४) महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक** | |
| (अ) व्यवस्थापकीय संचालक / सरव्यवस्थापक | मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदाशी संबंधित विषयातील पदवी किंवा एम.बी.ए./कॉस्ट अकौंटंट/ चार्टर्ड अकौंटंट आणि एच.डी.सी.एम./डी.सी.बी.एम./डी.सी.बी./ डी.सी.एम./ जी.डी.सी. अँड ए. |

| | |
|---|---|
| (ब) व्यवस्थापक / उपव्यवस्थापक / वरिष्ठ अधिकारी / विभागीय अधिकारी / अधिकारी संवर्ग -४/ सहायक विभागीय अधिकारी / जिल्हा शाखा व्यवस्थापक / प्रथम श्रेणी अधिकारी | विद्यापीठाची पदाशी संबंधित विषयातील पहिल्या वर्गाची पदवी किंवा पदव्युत्तर पदवी किंवा एम.बी.ए./कॉस्ट अकौंटंट/ चार्टर्ड अकौंटंट आणि एच.डी.सी.एम./ डी.सी.बी.एम. / डी.सी.बी./डी.सी.एम./जी.डी.सी. अँड ए. |
| **(०५) नागरी सहकारी बँका (रुपये ५० कोटींवरील ठेवी असणारे)** | |
| (अ) व्यवस्थापकीय संचालक/कार्यकारी संचालक/ मुख्य कार्यकारी अधिकारी / सर व्यवस्थापक / व्यवस्थापक | विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी किंवा एम.बी.ए./कॉस्ट अकौंटंट/ चार्टर्ड अकौंटंट आणि एच.डी.सी.एम./ डी.सी.बी.एम./डी.सी.बी./डी.सी.एम./जी.डी.सी.अँड ए. |
| (ब) वित्त अधिकारी / लेखाधिकारी / अधिकारी श्रेणी -१ | विद्यापीठाची पदाशी संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी किंवा एम.बी.ए. / कॉस्ट अकौंटंट / चार्टर्ड अकौंटंट आणि एच.डी.सी.एम./ डी.सी.बी.एम. / डी.सी.बी./ डी.सी.एम./ जी.डी.सी.अँड ए. |
| (क) इतर अधिकारी | विद्यापीठाची पदाशी संबंधित विषयातील पदवी आणि एच.डी.सी.एम./डी.सी.बी./ डी.सी.बी.एम./डी.सी.एम./जी.डी.सी. अँड ए. |
| **(०६) नागरी सहकारी बँका (रुपये ५० कोटींच्या आतील ठेवी असणारे)** | |
| (अ) व्यवस्थापकीय संचालक/कार्यकारी संचालक / मुख्य कार्यकारी अधिकारी / सर व्यवस्थापक / व्यवस्थापक | विद्यापीठाची पहिल्या वर्गातील पदवी किंवा एम.बी.ए./कॉस्ट अकौंटंट/ चार्टर्ड अकौंटंट आणि एच.डी.सी.एम./ डी.सी.बी.एम./डी.सी.बी./डी.सी.एम./जी.डी.सी.अँड ए. |
| (ब) वित्त अधिकारी / लेखाधिकारी / अधिकारी श्रेणी - १ | विद्यापीठाची पदाशी संबंधित विषयातील पदव्युत्तर पद किंवा एम.बी.ए./कॉस्ट अकौंटंट/ चार्टर्ड अकौंटंट आणि एच.डी.सी.एम./ डी.सी.बी.एम./डी.सी.बी./डी.सी.एम./जी.डी.सी.अँड ए. |
| (क) इतर अधिकारी | विद्यापीठाची पदाशी संबंधित विषयातील पदवी आणि एच.डी.सी.एम./डी.सी.बी./ डी.सी.बी.एम./डी.सी.एम./जी.डी.सी. अँड ए. |
| **(०७) सहकारी साखर कारखाने** | |
| (अ) व्यवस्थापकीय संचालक/कार्यकारी संचालक | विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी किंवा एम.बी.ए./कॉस्ट अकौंटंट/ चार्टर्ड अकौंटंट आणि एच.डी.सी.एम./ डी.सी.बी.एम./डी.सी.बी./डी.सी.एम./जी.डी.सी.अँड ए. |
| (ब) वित्त अधिकारी / व्यवस्थापक / सचिव/ लेखाधिकारी / अधिकारी श्रेणी - १ | विद्यापीठाची पदाशी संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी किंवा एम.बी.ए. / कॉस्ट अकौंटंट / चार्टर्ड अकौंटंट आणि एच.डी.सी.एम./ डी.सी.बी.एम. / डी.सी.बी./ डी.सी.एम./ जी.डी.सी.अँड ए. |
| (क) इतर अधिकारी | विद्यापीठाची पदाशी संबंधित विषयातील पदवी आणि एच.डी.सी.एम./डी.सी.बी./ डी.सी.बी.एम./डी.सी.एम./जी.डी.सी. अँड ए. |

**(०८) सहकारी सूत गिरण्या**

| | |
|---|---|
| (अ) व्यवस्थापकीय संचालक/कार्यकारी संचालक | विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी किंवा एम.बी.ए./ डी.सी.एम./ कॉस्ट अकौंट्ट/ चार्टर्ड अकौंटंट आणि एच.डी.सी.एम./ डी.सी.बी.एम./डी.सी.बी./ जी.डी.सी.अँड ए. |
| (ब) वित्त अधिकारी / व्यवस्थापक / सचिव/ लेखाधिकारी / अधिकारी श्रेणी – १ | विद्यापीठाची पदाशी संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी किंवा एम.बी.ए. / कॉस्ट अकौंटंट / चार्टर्ड अकौंटंट आणि एच.डी.सी.एम./ डी.सी.बी.एम. / डी.सी.बी./ डी.सी.एम./जी.डी.सी.अँड ए. |
| (क) इतर अधिकारी | विद्यापीठाची पदाशी संबंधित विषयातील पदवी आणि एच.डी.सी.एम./ डी.सी.बी./ डी.सी.बी.एम./डी.सी.एम./जी.डी.सी. अँड ए. |

**(०९) घाऊक ग्राहक भांडारे**

| | |
|---|---|
| सरव्यवस्थापक / व्यवस्थापक / सचिव | विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी किंवा एम.बी.ए. / कॉस्ट अकौंटंट आणि एच.डी.सी.एम. / डी.सी.बी.एम./डी.सी.बी./ डी.सी.एम./जी.डी.सी. अँड ए. |

**(१०) प्राथमिक ग्राहक भांडारे**

| | |
|---|---|
| सरव्यवस्थापक / व्यवस्थापक / सचिव | एस.एस.सी. आणि डी.सी.एम. |

**(११) प्राथमिक पणन संस्था**

| | |
|---|---|
| सरव्यवस्थापक / व्यवस्थापक / सचिव | विद्यापीठाची पदवी |

**(१२) प्राथमिक कृषि पतसंस्था**

| | |
|---|---|
| व्यवस्थापक / सचिव | एस.एस.सी. आणि डी.सी.एम. |

**(१३) कृषि प्रक्रिया सहकारी संस्था**

| | |
|---|---|
| सरव्यवस्थापक / व्यवस्थापक / सचिव | एस.एस.सी. आणि डी.सी.एम. |

**(१४) औद्योगिक उत्पादक संस्था**

| | |
|---|---|
| सरव्यवस्थापक / व्यवस्थापक / सचिव | एस.एस.सी. आणि डी.सी.एम. |

**(१५) मजूर सहकारी संस्था**

| | |
|---|---|
| व्यवस्थापक / सचिव | एस.एस.सी. आणि डी.सी.एम. |

**(१६) नागरी सहकारी पतसंस्था (रु. ५० लाखांवरील ठेवी असणाऱ्या)**

| | |
|---|---|
| सरव्यवस्थापक / व्यवस्थापक / सचिव | विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी आणि एम.बी.ए. / कॉस्ट अकौंटंट / चार्टर्ड अकौंटंट आणि एच.डी.सी.एम./ डी.सी.बी.एम./ डी.सी.बी./ डी.सी.एम./ जी.डी.सी. अँड ए. |

**(१७) नागरी सहकारी पतसंस्था (रु. ५० लाखांच्या आतील ठेवी असणाऱ्या)**

| | |
|---|---|
| व्यवस्थापक / सचिव | विद्यापीठाची पदवी आणि एच.डी.सी.एम./ डी.सी.बी.एम./ डी.सी.बी./ डी.सी.एम./ जी.डी.सी. अँड ए. |

**(१८) पगारदार नोकरांच्या पतसंस्था**

| | |
|---|---|
| सरव्यवस्थापक / व्यवस्थापक / सचिव | विद्यापीठाची पदवी |

**(१९) प्राथमिक हातमाग/यंत्रमाग सहकारी संस्था**

| | |
|---|---|
| सचिव | एस.एस.सी. आणि विणकर प्रशिक्षण वर्गाचा दाखला किंवा डी.सी.एम. |

**(२०) सहकारी गृहनिर्माण संस्था**

| | |
|---|---|
| सचिव | एस.एस.सी. |

**(२१) पाणी पुरवठा संस्था**

| | |
|---|---|
| व्यवस्थापक / सचिव | पाणी पुरवठा संस्थेच्या सचिव पदाचा प्रशिक्षणाचा दाखला किंवा एस.एस.सी. |

**(२२) आदिवासी सहकारी संस्था**

| | |
|---|---|
| व्यवस्थापक / सचिव / अकौंटंट / इतर अधिकारी | आदिवासी सहकारी संस्थांचे व्यवस्थापन या विषयाच्या प्रशिक्षणाची पदवी किंवा एस.एस.सी. |

**(२३) जंगल कामगार सहकारी संस्था**

| | |
|---|---|
| व्यवस्थापक / अकौंटंट / मुकादम | एस.एस.सी. आणि डी.सी.एम. |

---

**टीप :** (१) एच.डी.सी.एम. – हायर डिप्लोमा इन को–ऑपरेटिव्ह मॅनेजमेंट. (२) डी.सी.बी.एम. – डिप्लोमा इन को–ऑपरेशन अँड बिझेनस मॅनेजमेंट. (३) डी.सी.बी. – डिप्लोमा इन को–ऑपरेटिव्ह बँकिंग, (४) डी.सी.एम. – डिप्लोमा इन को–ऑपरेटिव्ह मॅनेजमेंट, (५) जी.डी.सी. अँड ए. – गव्हर्नमेंट डिप्लोमा इन को–ऑपरेटिव्ह अँड अकौंटन्सी

---